# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका कर्मचा-याच्या/निवृत्तीवेतनधारकाच्या
**{ लेखा व वित्त विभाग }** मृत्युनंतर त्यांचे अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारीरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करणेबाबत मा. प्रशासक यांचे समोर मंजूरी करीताचा प्रश्न विचारात घेणे.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ६४/सेवा-४ दिनांक ०७/०१/२०२५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ अन्वये कुटुंब निवृत्तीवेतनाबाबत तरतूदी नमुद करण्यात आलेल्या आहेत. सध्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार शासकीय कर्मचा-याच्या व त्याच्या प्रथम वारस (पती/पत्नी) यांच्या मृत्युनंतर अविवाहीत मुलीच्या बाबतीत ती २४ वर्षे वयाची होईपर्यन्त अथवा तिचा विवाह होईपर्यंत यापैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत तिला कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येते. तसेच मानसिक अथवा शारिरीक विकलांगता असलेल्या पाल्याला हयातभर कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्याची तरतूद आहे.

शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते हयात असताना त्यांची मुलगी अविवाहीत, घटस्फोटीत किंवा विधवा असेल व अशी मुलगी स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असेल तर अशा प्रकरणी केंद्र शासनाने शासकीय कर्मचा-याच्या व त्याच्या प्रथम वारस (पती/पत्नी) यांच्या मृत्युनंतर कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करणेबाबत निवृत्तीवेतनाबाबत सुधारणा केलेली आहे. (कार्यालयीन ज्ञापन दिनांक ३०/०८/२००४ व तदनंतर वेळोवेळी केलेल्या सुधारणा)

केद्र शासनाने केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्य शासनाच्या कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करण्याच्या कार्यपध्दती मध्ये उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाव्दारे सुधारणा करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर नागपूर महानगरपालिका कर्मचा-याच्या / निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्युनंतर त्यांच्यावर अवलंबित असलेल्या अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारीरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास उपरोक्त संदर्भीत शासन परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहुन कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करणेबाबतचे मान्यतेस म.न.पा. सभागृहासमोर प्रस्ताव ठेवावा लागेल परंतु सध्या म.न.पा. सभागृह अस्तित्वात नसल्यामुळे मा. प्रशासक यांचे मंजूरीकरीता सादर करण्यात येत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 37/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 01/08/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२

अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, लेखा व वित्त विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका कर्मचा-याच्या/निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्युनंतर त्यांचे अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारीरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करणेबाबत मा. प्रशासक यांचे समोर मंजूरी करीताचा प्रश्न विचारात घेणे.

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ६४/सेवा-४ दिनांक ०७/०१/२०२५.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ अन्वये कुटुंब निवृत्तीवेतनाबाबत तरतूदी नमुद करण्यात आलेल्या आहेत. सध्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार शासकीय कर्मचा-याच्या व त्याच्या प्रथम वारस (पती/पत्नी) यांच्या मृत्युनंतर अविवाहीत मुलीच्या बाबतीत ती २४ वर्षे वयाची होईपर्यन्त अथवा तिचा विवाह होईपर्यंत यापैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत तिला कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येते. तसेच मानसिक अथवा शारिरीक विकलांगता असलेल्या पाल्याला हयातभर कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्याची तरतूद आहे.

शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते हयात असताना त्यांची मुलगी अविवाहीत, घटस्फोटीत किंवा विधवा असेल व अशी मुलगी स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असेल तर अशा प्रकरणी केंद्र शासनाने शासकीय कर्मचा-याच्या व त्याच्या प्रथम वारस (पती/पत्नी) यांच्या मृत्युनंतर कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करणेबाबत निवृत्तीवेतनाबाबत सुधारणा केलेली आहे. (कार्यालयीन ज्ञापन दिनांक ३०/०८/२००४ व तदनंतर वेळोवेळी केलेल्या सुधारणा)

केंद्र शासनाने केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्य शासनाच्या कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करण्याच्या कार्यपध्दती मध्ये उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाव्दारे सुधारणा करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर नागपूर महानगरपालिका कर्मचा-याच्या / निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्युनंतर त्यांच्यावर अवलंबित असलेल्या अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारीरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास उपरोक्त संदर्भीत शासन परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहुन कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करणेबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.